

REIKI VIDYA NIKETAN

सर्वेः सन्तु निरामयाः

# रेकि ब्रह्म

वर्ष १०वे अंक ३रा

डिसेंबर २०२१

नव्या उर्जेची चाहूल..

email: reikibramhamasik@gmail.com



# वैश्विक चैतन्याच्या पुकाराला प्रतिसाद द्या

साऱ्या विश्वाची एक चेतना असते. त्या चैतन्यामध्ये सातत्याने परिवर्तने होत असतात. हीच चैतन्याची संक्रमणे. सामान्यत: विश्वातील साऱ्याच गोष्टी ह्या चैतन्याच्या परिवर्तनामध्ये स्वत:ला सामावत असतात. जसे असे मानले जाते कि ह्या परिवर्तनामध्ये वनस्पति आणि झाडे-झुडपे एवढी बदलली कि मानवाने गेल्या १०० वर्षात जेवढी प्रगति केली त्याच्या जवळ जवळ ४०,००० पटीने ह्या झाडा-झुडपांनी आणि वनस्पतिंनी स्वत:ला चैतन्याच्या परिवर्तनात झोकून दिले. त्यामुळे परिवर्तनाच्या ह्या काळात त्यांना फारसा त्रास झालेला दिसला नाही. मानवी चैतन्य मात्र ह्या परिवर्तनात स्वत:ला फारसे झोकू शकले नाही. महर्षि अरविंदांच्या मते वैश्विक जीवनाच्या चैतन्यामध्ये जी संक्रमणे होत आहेत त्याचाच पडसाद म्हणून मानवी अस्तित्वामध्ये सुद्धा अतिमानस चैतन्यामध्ये बदल होत असतात. त्या चैतन्याच्या संक्रमणाला जर मानवी मानस चैतन्याने प्रतिसाद दिला नाही तर त्यामध्ये एका संघर्षाची परिस्थिती तयार होते ज्याला सामान्यत: शारिरीक अथवा मानसिक विकार अशी संज्ञा दिली जाते. ह्याचाच अर्थ साऱ्या मानवी विकारांच्या आणि साथींच्या मागे हा संघर्ष कारणीभूत आहे. वैश्विक परिवर्तनात मानवी मानसिक चैतन्याने का पूरक होऊ नये ह्याची बरीचशी कारणे असू शकतात.

गेल्या शेकडो वर्षात मानवी जीवनामध्ये बरीच परिवर्तने झाली परंतु ती सारी केवळ मानस स्तरावरचीच होती. ज्याला सामान्यत:

मानवी विकास अथवा मानवी प्रगति असे मानले गेले. म्हणजे प्राचीन किंवा अर्वाचीन काळी आदिमानव गुहांमध्ये राहून दगडांच्या हत्यारांनी प्राण्यांची आणि वेळ पडल्यास दुसऱ्या मानवाची पण शिकार करायचे. पण त्यात एक मर्यादीतपणा होता. स्वतःच्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी तो माणुस एका वेळेला एका दगडाने एकच शिकार करू शकायचा. आपण गेल्या काही वर्षांमध्ये गुहा सोडून मानव-निर्मित मनोऱ्यांमध्ये (टॉवर्स) राहून प्रगत अशा मिसाईलसारख्या शस्त्रांचा उपयोग करून सामूहीक संहार करू लागलो. माणसाच्या हिंसा करण्याच्या मर्यादा रुंदावल्या आणि आपण काहीतरी फार मोठी प्रगति केल्याचे समाधान मानून त्यालाच उत्क्रांति मानून स्वतःचीच पाठ थोपटू लागलो. वैश्विक उत्क्रांतिचा आपल्याला मागमूसही नव्हता एवढ्या अहंकारात मानव स्वतःला स्वतःच्या जगाचा निर्माता म्हणवू लागला. वैश्विक अतिमानसी चैतन्याच्या पूरकतेला आपण समजूच शकलो नाही. कदाचित ह्या चैतन्याला आणि चैतन्याच्या परिवर्तनाला आपल्या तथाकथित प्रगतिने बाधाच जास्त पोहोचवली. आणि त्याचाच परिपाक म्हणजे एक भयानक संघर्ष जो चैतन्याच्या ह्या दोन स्तरांत होऊ लागला आणि त्यातूनच मानवी अस्तित्वाला घातक अश्या रोग-विकारांना आपण बळी पडू लागलो. त्याचाच एक परिणाम म्हणजे वाढते प्रदूषण ज्यानेही मानवी दुःखांचा आणि यातनांचा पाया रचला. नैसर्गिक प्रज्ञेची (Natural Intelligence) कास सोडून आपण कृत्रिम प्रज्ञेची (Artificial Intelligence) कास पकडली. नैसर्गिक प्रज्ञेचा आपण १०% सुद्धा वापर करू शकलेलो नाही हे आपल्या अहंकाराने आपल्याला कधीच समजू दिले नाही. एवढी अमर्याद ताकद असूनही आपण मानवी अहंकाराने मदमस्त होऊन निसर्गाच्या विरोधात जाऊन कृत्रिम गोष्टींकडे वळलो.

साधकांनी तरी ह्या नैसर्गिक परिवर्तनाच्या लाटेमध्ये सामिल होऊन निसर्गाची मदत घेऊन आपल्या उत्थानाची तयारी करायला हवी. अतिमानस चैतन्याला सामोरे जाण्यासाठी आपल्या भूतकाळातील चक्रव्यूहांचे भेदन करायला हवे. जुन्या धारणांना आणि अनुभवांना बाजूला सारून आपणच रचलेल्या आपल्या सापळ्यांतून बाहेर पडायला हवे. एका निरोगी, निर्मळ, वासनारहित अशा नव्या जीवनाला आलिंगन द्यायला हवे. हे फार आव्हानात्मक तर आहेच परंतु आपल्यातील देवत्वाला साकडे घालून आणि आपल्या सदगुरूंच्या आशिर्वादाखाली आयुष्याच्या जुन्या पुराण्या चौकटी मोडून टाकायला हवे. ह्यामध्ये नव्या पिढीची आपल्याला मोठीच मदत मिळेल ह्यावर विश्वास हवा.

जाता जाता एक सूचना. २०२२ची सुरूवात आता होणार आहे. २०२०नी लाखो लोकांचे प्राण हरून मानवी जीवनाच्या स्थूल परिमाणाचा कणा मोडला तर २०२१ने मानवी मनावर जोरदार आघात करून त्या मनाचा चोळामोळा करून टाकला. २०२२ हे वर्ष आपल्या भावनांचा चुराडा करायला सिद्ध झाले आहे ह्याची दखल आपण घेऊ या. मानवी जीवनातील नात्या-गोत्यांची आता कसोटी लागू शकते. मानवी भावनांवर साऱ्या मानव जीवन व्यवस्थेची बैठक आहे हे लक्षात घेतले कि ध्यानात येईल कि भावनांचा चक्काचूर झाला तर मानव जीवन व्यवस्था कोसळून मनुष्य पुन्हा एकदा पाशवी अस्तित्वाच्या विळख्यात जाऊ शकतो. म्हणूनच **आपल्या प्रतिक्रियांची दखल घ्या. काळजी घ्या. प्रत्येक घटनेवर प्रतिक्रिया करायलाच हवे असे जरूरी नाही. आपल्या भावना सांभाळा, आपल्या प्रतिक्रिया सांभाळा. स्वतःच्या अस्तित्वाचे स्वामी बनताना आपल्या भावनांवरती संयम ठेवा हीच सर्वांना हात जोडून विनंति. नवे वर्ष आपल्या सर्वांना सुखाचे, स्वास्थ्याचे, आनंदाचे आणि अध्यात्मिक प्रगतिचे जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.**



**अजित सर**
नोव्हेंबर २९, २०२१

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान




**अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे**

## मनाच्या पलीकडे

अध्यात्मिक प्रगतीच्या व समजेच्या वेगवेगळ्या पातळ्या किंवा समजेची प्रगल्भता यांचा खरतर आत्म्याशी काहीच संबंध नाही. जे काही आहे ते चिरकालीन सत्य आहे. अनंत काळापासून चालत आलेले आहे. असे समजा की निसर्ग सौंदर्य असलेल्या एका छान ठिकाणी आपण बसलेलो आहोत. पण आपल्या समोर एक मोठा कापडाचा पडदा लावलेला आहे. त्या पडद्याला एक छोटसं छिद्र आहे. त्यातून आपल्याला पलीकडे असलेले निसर्ग सौंदर्य किंचितसे दिसत आहे. आता कल्पना करा की हळूहळू हे छिद्र जर मोठं मोठं होऊ लागलं, तर? तर मग नक्कीच आपल्याला पलीकडे असलेले निसर्ग सौंदर्य अधिकाअधिक सुस्पष्ट दिसू लागेल. अन जेव्हा तो कापडाचा पडदा पूर्णपणे बाजूला सारून, काढून टाकला जाईल तेव्हा? तेव्हा, मागे असलेले ते निसर्गसौंदर्य आणि आपण यात कोणीच नसेल. आपल्यात आणि त्या निसर्गसौंदर्यात आता कोणताच आडपडदा नसेल. हा पडदा म्हणजेच माणसाचा मन आणि त्या मनाच्या मागे आहे तो अनादि, अनंत, असीमशक्ती असलेला आत्मा. जो कधीच बदलत नाही. बदलतं ते मन. पण एकदा का त्या मनाच्या पलीकडे गेलं की त्या दिव्य आत्म्याचं दर्शन होतं.



## साक्षीदार बना !

खरे सांगायचे तर "मी आत्मा आहे, अन साक्षी भावाने हे सर्व काही पाहत आहे ही समज महत्वाची आहे. कोणतीही बाह्य गोष्ट मला स्पर्श करू शकत नाही, मला अपाय करू शकत नाही अन मला अपवित्र देखील करू शकत नाही, हे ध्यानात ठेवा. अगदी जेव्हा आपल्याच मनात वाईट विचार येतात तेव्हा देखील हे लक्षात ठेवा, त्या वाईट विचारांवर या स्थिर विचारांनी जणू हातोडयान आघात करा अन त्यांना सांगा की "मी आत्मा आहे, मी तर फक्त एक साक्षीदार आहे, मी परिपूर्ण आहे, मी संपूर्ण आहे, मला मोहात पाडू नका, अन नादी तर मुळीच लावू नका. नवनवीन इच्छा आकांक्षा निर्माण करून तुम्ही मला दु:खी करूच शकत नाही, अन त्या पूर्ण करण्याच्या खेळात अडकवू शकत नाही. दु:खाचे कोणतेच कारण मला स्पर्श करू शकत नाही. मी म्हणजेच हे विश्व आहे. यातील प्रत्येक गोष्ट मीच आहे. आयुष्यातील प्रसंग म्हणजे जणू निरनिराळी चित्रे, जी चित्रे मी गॅलरीत बसून म्युझियम पहावे तसे पाहतो आहे. ती सगळी चित्रे चांगलीच आहेत. मग प्रसंग सुखाचे असोत की दु:खाचे. हे सारे अद्भूत आहे. एका महान चित्रकाराची ही अद्भूत अन अलौकीक किमया आहे.

## तुम्हाला खरोखरीच परमेश्वर हवा आहे का?

प्रत्येक दिवशी स्वत:ला प्रश्न विचारा "मला खरंच देव हवा आहे का?" कारण आपण कधीतरी धर्म अन अध्यात्माबाबत बोलू लागतो आणि विशेषत: जेव्हा आपण फार ज्ञानी असल्याची अन त्या परमेश्वराची आस जणू आपल्याला लागली आहे अशी भूमिकादेखील त्या वाद विवादात घेतो आणि इतरांना शिकवायलाच सुरुवात करतो. म्हणून म्हणतो, आपण स्वत:लाच आधी विचारले पाहीजे की खरंच मला परमेश्वराची इतकी आस लागली आहे का?

मला अनेक वेळा जाणवते की बऱ्याचदा देव नकोच असतो. हवा असतो भाकरीचा तुकडा. मला तो भाकरीचा तुकडा मिळाला नाही तर मी अगदी वेडापिसा होऊन जातो. अनेक स्त्रिया त्यांना सोन्या चांदीचा दागिना न मिळाल्यास वेडया होतील, एवढी आर्तता परमेश्वर प्राप्तीची आहे का?

एक जुनी म्हण आहे "जर मला शिकारी व्हायचे असेल, तर मी गेंडयाची शिकार करेन, जर मला दरोडेखोर व्हायचे असेल तर मी राजाचा खजिना लुटून घेईन, भिकाऱ्यांना लुटण्यात अन मुंग्यांची शिकार करण्यात कोणता पुरुषार्थ आहे?

**म्हणून जर तुम्हाला त्या आर्ततेने प्रेम करायचे असेल, तरच देवावर प्रेम करा.**

# यालाच वेडया जीवन म्हणती

पहाटेचा गंधीत वारा
जाईजुईचा सुगंध ल्याला
नवी आशा नवी उमेद
चैतन्याला घेऊन आला ॥१॥

सकाळच्या मग सुरेख प्रहरी
परडीमध्ये फुलेही सजली
देवपूजा ही करूनी गात्रे
मंगलतेने भरून गेली ॥२॥

दुपारची ती निवांत वेळ
पत्यांचा मग रंगे खेळ
हरणे – जिकंणे होतच राही
आनंदाला एकच मेळ ॥३॥

संध्येचे ते रुप वेगळे
लाल– गुलाबी रंग आगळे
दिवेलागणी देवापुढती
पर्वचांचे सूर उमटती ॥४॥

चंद्राचा मग प्रकाश पसरे
रजनीच्या त्या रम्य अंगणी
शुभ्र चांदणे भरून घ्यावे
शीतलताही मनोमनी ॥५॥

रात्रीचा अंधार सारूनी
उन्मेशाचे स्वरुप घेते
पुन्हा नव्याने परतूनी मागे
सोनपावली पहाट येते ॥६॥

काळाच्या या पाच कन्यका
अभंग अन अविरत फिरती
काळाचा हा खेळच सारा
यालाच वेडया जीवन म्हणती ॥७॥

तेजश्री रानडे, देवगड



# अष्टावक्र गीता

## अध्याय ६वा

**अजित सर**

### सूत्र ६.१

आकाशवदनन्तोऽहं घटवत्प्राकृतं जगत् ।
इति ज्ञानं तथैतस्य न त्यागो न ग्रहो लयः ॥१॥

**अर्थः** मी आकाशासारखा अनंत आहे. मला माहीत आहे कि हे विश्व मात्र घटासारखे प्रकृतिजन्य आहे. म्हणूनच ना त्याचा त्याग आहे, ना स्वीकार आणि ना विनाश.

पांचव्या प्रकरणात अष्टावक्र जनकाच्या आत्मज्ञानाचे कौतुक करत आश्वासकरित्या त्याला मोक्षप्राप्तिचा उपाय सांगतात तर ह्या अध्यायात ते पाहू इच्छितात कि जनकाला अजूनही मोक्षाची इच्छा आहे कि नाही. कारण इच्छा असेल याचा अर्थ तो अजूनही मोक्षपदाला प्राप्त झाला नाही. जेथे काहीच मिळवायचे नाही, काहीच गमवायचे नाही आणि कशाचाच लय करायचा नाही म्हणजेच मोक्ष. ह्या प्रकरणात, जनक अष्टावक्रला आपण मोक्षपदाला पोहोचलो आहोत याची ग्वाही देत आहेत. पहिलेच उदाहरण त्यांनी आकाशाचे दिले आहे. जसे घटातले आकाश आणि बाहेरचे आकाश मूलतः एकच आहे पण वेगळे भासते तद्वतच आपली आताची स्थिती आहे हे आपण जाणतो हे त्याने निःसंदिग्धपणे येथे सांगितले आहे.

### सूत्र ६.२

महोदधिरिवाहं स प्रपन्चो वीचिसन्निभः ।
इति ज्ञानं तथैतस्य न त्यागो न ग्रहो लयः ॥२॥

**अर्थः** समुद्राच्या पाण्यात जसे बुडबुडे, फेस आणि लाटा येत असतात ते समुद्रामुळे तसेच विश्वाचा हा पसारा तुझ्याच आत्म्याचा आविष्कार आहे हे समजून घे आणि तुझ्या अलगतेचा लय कर आणि मोक्षाला तयार हो.

येथे जनक म्हणतात कि जीवन किंवा विश्व हे फक्त समुद्राच्या लाटांसारखे आहे हे मला आता समजले आहे. पहिल्या उदाहरणामध्ये आकाश आणि घट हे वेगळे दिसतात एवढे मात्र खरे. त्यामुळेच जनक आणखी उदाहरण देऊ इच्छितात. मी समुद्र आहे आणि विश्व हा माझ्यातून निघून माझ्यातच विलीन होणाऱ्या लाटा आहेत. जीवन एक आभास आहे. म्हणूनच ना त्याचा त्याग आहे, ना स्वीकार आणि ना विनाश.

## सूत्र ६.३

अहं स शुक्ति संकाशो रूप्यवद्विश्वकल्पना ।
इति ज्ञानं तथैतस्य न त्यागो न ग्रहो लयः ॥३॥

**अर्थः** मी शिंपलीसारखा आहे आणि विश्वाची कल्पना चांदीसारखे आहे हे मी जाणतो. म्हणूनच ना त्याचा त्याग आहे, ना स्वीकार आणि ना विनाश.

वरील उदाहरणामध्ये समुद्र आणि त्याच्या लाटा यांच्यामध्ये अजूनही भेद आहे आणि थोडे का होईना द्वैत आहे. येथे जनकाला वाटते कि शेवटी लाटाही समुद्रात विलीन होतात म्हणजे अजूनही द्वैत आहे. परंतु मी शिंपली आहे त्याला चांदी समजणे हा तर पूर्ण आभास आहे. म्हणूनच ना त्याचा त्याग आहे, ना स्वीकार आणि ना विनाश.

## सूत्र ६.४

अहं वा सर्वभूतेषु सर्वभूतान्यथो मयि ।
इति ज्ञानं तथैतस्य न त्यागो न ग्रहो लयः ॥४॥

**अर्थः** मी निश्चितपणे सर्व प्राणीमात्रांमध्ये आहे आणि हे प्राणीमात्र माझ्यात आहेत हे मी जाणतो. म्हणूनच ना त्याचा त्याग आहे, ना स्वीकार आणि ना विनाश.

वरील तीन उदाहरणांमध्ये अद्वैताची पूर्ण व्याख्या अजून झाली नाही म्हणून जनकाने हे चौथे उदाहरण दिले. सर्व भूतमात्र वेगवेगळे शरीरधारी असे भासले तरी सर्वांमध्ये मीच (माझाच आत्मा आहे) हे मी जाणतो. तत्वतः रूप आणि अरूप, सूक्ष्म आणि स्थूल, निराकार आणि साकार यामध्ये कसलाच भेद नसतो. बाष्प पण जल आहे आणि जलामध्ये सुद्धा बाष्प आहे. म्हणूनच ना त्याचा त्याग आहे, ना स्वीकार आणि ना विनाश.

# देमो दूक – ले लदाख
## (खूप सुंदर लदाख)

यामिनी कुटुंबळे (वडोदरा).



**जूल–ले (नमस्कार) !!**

लेह–लडाखचा प्रवास सुरु होण्यापूर्वीच, मार्गात अनेक अडथळे येत होते. ते दूर करण्यासाठी, केलेल्या प्रयत्नांना यश मिळविण्यासाठी, तीन घटकांवर माझा विश्वास होता. ते तीन घटक आहेत प्रयत्न, काळ आनि दैव.

माझी प्रवास करण्याची योजना होती पण कुठे, कसे हे अधांतरी असणारे प्रश्न होते. म्हणून प्रवासन स्थळ आणि संसाधने शोधण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. कोव्हीडच्या काळातही मला माझ्या प्रवासाच्या बुकींगमध्ये कोणातीही अडचण नव्हती.

दुसऱ्या घटकाचा माझ्या प्रवासाच्या योजनांवर परिणाम झाला. तो म्हणजे 'काळ' (वेळ). जेव्हा माझे काही मित्र सामील होऊ शकले नाहीत तेव्हा मला जाणवले की मी अगदी वेळेत प्रयत्न केले होते. 'दैव' या तिसऱ्या घटकाने माझ्या प्रवासाचे नियोजन अगदी वेळेत करण्यात महत्वाची भुमिका बजावली. भूस्खलन, कोव्हीड लाट आणि इतर अडथळ्यांच्या बातम्या ऐकू येत होत्या. पणा सततचे प्रयत्न आणि दैवावर विश्वास, माझ्या प्रवासाच्या नियोजनातल्या मुख्य प्रेरक शक्ती होत्या.

### दिवस १ : अंबालाच्या दिशेने प्रवास

उत्तर भारतातल्या शेतकरी आंदोलनामुळे गाडया एकतर रद्द होत होत्या किंवा उशिरा येत होत्या. माझ्या लडाख प्रवासाच्या प्रयत्नावर परिणाम करणारा तिसरा घटक म्हणजे अनिश्चितता. गाडी येण्याबद्दलची अनिश्चितता, हा असा घटक होता, जो माझ्या नियंत्रणाबाहेर होता. अनिश्चित घटकांना माझ्या बाजूने वळवण्यासाठी, मी सतत दैवाकडून मदत मागत होते. मी माझ्या प्रवासाच्या यशासाठी सतत प्रार्थना करत होते. अखेर गाडी प्लॅटाफॉर्म वर आली आणि आम्ही त्यात चढलो.

१२ तासांपेक्षा जास्त काळाच्या प्रवासाची सुरुवात करताना पावसामुळे बहरलेल्या निसर्गाचा आनंद घेण्यासाठी आमच्याकडे बऱ्यापैकी अनुकूल जागा होत्या. दुसऱ्या दिवशी आम्ही अंबालाला पोहोचलो. मनालीच्या प्रवासात बरोबर असणाऱ्या आमच्या सहप्रवाशांना भेटलो.




## दिवस २ : अंबाला ते मनाली


हिमाचल प्रदेश, जणू स्वर्ग भासणाऱ्या पर्वतरांगा तुम्हाला पहिल्या दृष्टीक्षेपात मोहीत करतील. प्रदूषणरहित असलेले हे राज्य सर्वांना भुरळ घालणारे आहे. हिमाचल हे भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे असे म्हणायला हरकत नाही. मनालीला पोहोचल्यावर ज्याच्या नावातच 'पॅरेडाइज' आहे अशा हॉटेलवर आम्ही पोहोचलो. हॉटेलचे नाव ऐकल्यावर मला खात्री पटली की हा प्रवास अविस्मरणीय असेल.तो दिवस विश्रांती घेण्याचा आणि समुद्रसपाटी पासून असणाऱ्या उंचीशी आणि हवामानाशी जुळवून घेण्याचा होता. चेक इन करण्यापूर्वी, आम्ही एका मंदिरासमोर थांबलो. कुल्लू मधील माता वैष्णोदेवी मंदिर १९६६ मध्ये स्वामी सेवक दासजी महाराजांनी बांधले होते. बियास नदीच्या काठी वसलेले हे महादेवी तीर्थ आहे. हे मंदिर म्हणजे बहुमजली इमारत आहे, ज्यामध्ये देवी पार्वतीची महाकाली स्वरूपातील मूर्ती, देवी लक्ष्मी आणि देवी सरस्वती प्रत्येक स्तरावर स्थापित आहे. वैष्णोदेवीची मूर्ती स्थापन करण्यासाठी कृत्रिम गुहा तयार करण्यात आली आहे. इअथे सुंदर लाकडी कोरीवकाम आणि मनालीची स्थापत्य शैली आपण पाहू शकतो.

## दिवस ३ : मनाली दर्शन

मनाली अनेक गोष्टींसाठी प्रसिध्द आहे. त्यापैकी काही मोमो, बर्फ, डोंगर आणि हिडिंबा मंदिर आहेत. आमःइ प्रसिध्द वशिष्ठ मंदिर, हिडिंबादेवी मंदिर, घटोत्कच मंदिर आणि माल रोड पाहिले. या मंदिराच्या भेटींनी आम्हाला आपल्या संस्कृतीची एका वेगळ्या दृष्टिकोनातून ओळख करून दिली आणि या भेटीमुळे महाभारतातले विशाळ तत्वज्ञान आणि त्यातील नैतिकतेची आठवण करून दिली. संग्रहालय, मॉल रोड आणि क्लब हाऊसला भेट देणे मजेदार होते. स्वर्गाच्या पुढील स्तरात जाण्याची तयारी करण्यासाठी आम्ही आमच्या पार्क पॅरेडाईज मध्ये परतलो.









# कभी नही देखे ऐसे गुरूवर..

सौ. वंदना तेलंग, ठाणे

## शिष्य लाडका का आहे ते बघा, त्याचा मत्सर करू नका..

जय जय स्वामी समर्थ ह्या मालिकेतील ह्याच महिन्यातील एका भागात स्वामींच्या तोंडी हा संदेश आहे. स्वामींची नखे कापणारा सदा न्हावी आणि त्याची बायको तिलोत्तमा स्वामींच्या नखांचा व्यापार मांडतात. अर्थातच स्वामींना याची जाण असतेच. ते सातत्याने ह्या दोघांना तसे न करण्याचा सल्ला देत असतात., परंतु तिथे दुर्लक्ष करून त्यांचे हे चाळे सुरूच असतात. शेवटी तेच होते जे स्वामी त्यांना सांगत असतात. अति हव्यासापायी सदा न्हाव्याच्या संपूर्ण कुटुंबावरच परागंदा व्हायची वेळ येते. तिलोत्तमा तर विष खाऊन मरण्याची खोटी धमकी आपल्या घरच्यांना देते. स्वामींचे तर ह्या सगळ्या प्रकाराकडे लक्ष्य असतेच.

तिलोत्तमेची खोटी धमकी माहित असल्याने स्वामी तिच्याकडे विष घेऊन जायला आपल्या परम शिष्य चोळाप्पांना सांगतात. हे असे कार्य करायला चोळाप्पा तयार होतो हे पाहून स्वामींचे इतर शिष्य चमकतात. स्वामींच्या सांगण्यावरून कोणालातरी विष देऊन त्या व्यक्तीचा अंत करायचा ही कल्पनाच इतर साधकांना असह्य वाटते. परंतु चोळाप्पांची स्वामींवर गाढ श्रद्धा असते. स्वामी जे सांगतात ते शंभर टक्के पाळायचे हा चोळाप्पांचा निर्धार असतो, त्यांना स्वामींवर विश्वास असतो कि स्वामी काहीच आणि कधीच चुकीचे करणार नाहीत. तो निर्धास्तपणे स्वामींनी दिलेली विषाची पुडी घेऊन सदाच्या घरी जाऊन ती तिलोत्तमेच्या हाती देतो व सगळ्या परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवतो.

हे पाहून हबकलेले इतर सेवेकरी आपापसात चर्चा करत असतात कि हे चोळाप्पा कसे काय करू शकतात? स्वामींना तर हे माहितच असते कि चोळाप्पांवरील त्यांचे अपार प्रेम इतर सेवेकऱ्यांना बोचत असते. त्यांना कळत नसते कि चोळाप्पाकडे असे काय आहे कि स्वामींची त्याच्यावर एवढी प्रीति आहे. स्वामी त्यांना हेच नजरेला आणून देतात कि श्रद्धा आणि समर्पण ह्याच गोष्टी गुरूला आपल्या शिष्याकडून अपेक्षित असतात. हाच फरक असतो सामान्य शिष्य आणि गुरूंचे लाडके शिष्य ह्यांमध्ये. स्वामी इतारांना सांगतात कि केवळ तो लाडका आहे म्हणून त्याचा मत्सर करू नका. पूर्ण विचार करा कि तो का लाडका आहे. कोठलाच गुरू तसा आपल्या शिष्यांमध्ये भेदभाव करत नसतो. परंतु ज्या कार्यासाठी गुरुंनी अवतार घेतला असतो त्या कार्यामध्ये मदत करणारा शिष्य त्यांना नेहमीच प्यारा असतो. गुरु-शिष्य हे नाते काही फक्त स्वार्थासाठी नसते. स्वत:साठी गुरु कधीही आपल्या शिष्याकडून अपेक्षा करत नसतो. परंतु जनकल्याणाच्या त्याच्या कार्यात स्वत:चा विचार बाजूला सारून पूर्ण समर्पणाने आणि श्रद्धेने जो शिष्य गुरूचा आदेश पाळतो त्यालाच गुरुच्या प्रेमाची सावली जास्त मिळत असते.

# आश्रम वार्ता

## (१) देवरूख आश्रमातील दिवाळी उत्सव

देवरूख आश्रमातील दिपावली उत्सव हा नेहमीच रेकि साधकांच्या आणि स्वामीभक्तांच्या कौतुकाचा विषय राहीला आहे. गेली दिपावली तशी कोरोनाच्या काळ्याकुट्ट सावलीखाली झाकोळली गेली होती. परंतु ह्या वर्षीच्या (२०२१) दिवाळिने मात्र पुन्हा आपले मूळ स्वरूप धारण केले. अगदी वसूबारस पासून भाऊबीजेपर्यंत आश्रम कसा भक्तीरसामध्ये आणि प्रकाशाच्या प्रवाहामध्ये डुंबुन गेला होता. अर्थातच वसूबारसच्या दिवशी कालिंदीच्या आठवणीने सर्वांनाच जड झाले होते हे निर्विवाद. परंतु कालिंदी–पुत्र मित्र आणि गिरची गाय मानसी ह्या दोघांनी कालिंदीची जागा भरून काढून पुन्हा एकदा काळाचा महिमा नजरेसमोर आणला.

मठातील परिसर चारही दिवस पणत्यांच्या माळांनी सजून गेला होता. ह्या चार दिवसांत जणू स्वर्गच पृथ्वीवर अवतरतो याची साक्ष आपला देवरूख मठ दर वर्षीच देत असतो. मठातील साधकांनीच केलेले लक्ष्मीपूजन यावेळेला आणखीच रसभरित होते याचे कारण म्हणजे प्रत्यक्ष कामाक्षीमातेची मठातील उपस्थिती. देवीचा वावर आप्ल्या अवतीभवती आहे यापेक्षा भक्तांना आणखी कोणत्या मोठ्या जाणिवेची आवश्यकता असेल?

मठातील भाऊबीज हा आणखी एक मोठा सोहळा. तरूण पिढीतील भक्त आणि साधकजन आवर्जून आपल्या साधक भगिनींकडून ओवाळून घेतात हे दृश्य विकृत मनस्थितीतील सामान्य जगाला एक वेगळीच प्रेरणा देऊन जाते.







# आश्रम वार्ता

## (२) परिपूर्ण उपचार पद्धति (इंटिग्रल हिलींग) या विषयावरचा प्रशिक्षण वर्ग

दिपावली संपली आणि लगोलगच आणखी साधकांची लठात ये जा सुरू झाली. लगबगीने वेगवेगळ्या केंद्रांतून येणाऱ्या साधकांच्या लगबगीचे कारण होते मठात सुरू होणारा ज्ञानोत्सव. गुरुजींनी आपल्या ज्येष्ठ साधकांसाठी "इंटिग्रल हिलींग" किंवा परिपूर्ण उपचार याविषयी एक ५ दिवसांचे शिबिर भरवले होते. दिवसातून प्रभात सत्र आणि सांज सत्र अशा दोन सत्रांमधून चालणाऱ्या ह्या पाच दिवसीय शिबिरात अतिमानस चैतन्यावरती उहापोह केला गेला. हे अतिमानस चैतन्य साऱ्या विश्वामध्ये अवतरले असून मानवी अस्तित्वातही उतरत आहे परंतु मानवी अस्तित्व अजूनही आपल्या जुन्या धारणांना आणि मानस चैतन्याला घट्ट पकडून राहील्याने रोगराई, ताण तणाव, हिंसाचार इत्यादि गोष्टींना सामोरे जात आहे. मानवी जीवनामध्ये एक महापरिवर्तन होऊन माणूस आपल्या दु:खाच्या पलिकडे जाऊन एका सतयुगाची मुहुर्तमेढ करू शकेल असे योगी अरविंदाचे म्हणणे होते. त्यावरती आधारित ह्या शिबिराने साधकांना एका नव्या पर्वाची तर जाणिव करूअन दिलीच परंतु आपल्यातील अतिउच्च चैतन्याची पातळी कशी गाठावी याचेही मार्गदर्शन या शिबिरात झाले. एका नव्या विचाराने भारलले साधक जीवनाच्या एका नव्या पैलची ओळख आणि पर्याय घेऊन गेले.

## (३) आश्रमातील तुळसी विवाह

या वर्षीचे आकर्षण म्हणजे मुख्यत: कामाक्षी देवीचे आगमन. ह्या दिव्य शक्तीने मठाच्या चैतन्यामध्ये केवढा फरक पडला हे फक्त मठाशी संबंधीत साधकच जाणतात. ह्याच शक्तीच्या प्रेरणेने यावर्षी मठात तुळसी विवाह मोठ्या उत्साहात पार पडला. आपला मठ म्हणजे तुळसीचे आगरच जणू, तुळशी विवाह साजरा करण्याची आजपर्यंतची इच्छा यावर्षी मात्र छान पार पडली. देवरूखात एक प्रख्यात पुजारी भावे भटजी यांनी पौरोहित्य केले व कार्तिक शुद्ध द्वादशीच्या दिवशी तुळसी विवाह धूम धडाक्यात पार पडला. मठातील वग़्राडी मंडळी आनंदात चिंब भिजून गेली.





## मेरी तरफ तुम ध्यान से देखो, इम्तिहान तुम लेके देखो ॥

# 14

माझ्याकडे तुम्ही ध्यान देऊन बघा, माझी परीक्षा घेऊन बघा, असे आव्हानच जणू स्वामींनी येथे भक्तांना दिलेले आहे. येथे ध्यान या शब्दाचे बरेच अर्थ आहेत हेही आपल्याला लक्षात घ्यायचे आहे. ध्यान म्हणजे लक्षपूर्वक बघणे, किंवा माझे सातत्याने चिंतन करा. ध्यानाचा आणखी एक अर्थ म्हणजे अवधान असणे किंवा जागृतिपूर्वक जगणे. सामान्यत: आपण अगदी देवाकडे सुद्धा पाहताना आपले पूर्ण लक्ष देवाकडे नसते. पूजापाठ करताना सुद्धा आपले मन सातत्याने सांसारिक गोष्टींमध्ये विचलित झालेले असते. पूर्णपणे मनाला विचलित न होता जर आपण परमेश्वराकडे पाहिले तर मगच त्या जगन्नियंत्या परमेश्वराची परीक्षा करायला आपण लायक होतो.

आज बहुसंख्यांक परमेश्वराला समर्पित न होता त्याची परीक्षा घ्यायला उतरले आहेत हे दुर्दैव. माझ्या एका व्याख्यानामध्ये एका तथाकथित अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेच्या कार्यकर्त्याने मला म्हटले कि तुम्ही आत्म्याच्या गोष्टी करता परंतु तो दाखवू शकाल काय? मी त्याला विचारले कि तू काय शिकला आहेस. गृहस्थ म्हणाला तो इंजिनीयर आहे. मग मी त्याला विचारले कि त्याला मूलबाळ आहे का? त्याने सांगितले कि त्याला एक दोन वर्षांचे बाळ आहे. मी त्याच गृहस्थाला मग विचारले कि तू इंजिनीयर आहेस हे त्या बाळाला तू कसे सिद्ध करशील? तो सुरूवातीला म्हणाला कि त्याला मी माझे प्रमाणपत्र दाखविन. मी त्याला म्हटले अरे तो तर ते फाडून टाकेल. त्याला काही वाचता येते का? मग त्याचे उत्तर होते कि मी त्याला माझी जाडी जाडी पुस्तके दाखवीन. मी म्हटले त्याला कागद फाडायची आणखी एक मोठी संधी. त्याला मी म्हटले कि एखाद्या गोष्टीची परीक्षा घ्यायची असेल, शहानिशा करायची असेल तर त्यासाठी आपली लायकी हवी. ती जेव्हा आपण प्राप्त करतो त्याचवेळेला आपण परीक्षक बनू शकतो. अन्यथा नाही. स्वामी येथे कोठल्याही परीक्षेला उतरायला तयार आहेत. फक्त आपण मात्र त्या परीक्षेसाठी तयार असायला हवे. त्यासाठी स्वामी म्हणत आहेत कि तू ध्यानपूर्वक माझ्याकडे पहा. मला समर्पित हो आणि मगच माझी काय परीक्षा घ्यायची आहे ती घे. स्वामींची अशी परीक्षा बऱ्याच भक्तांनी आजवर घेतली आहे आणि तो स्मरणगामी त्या सगळ्या परीक्षांमध्ये १००% टक्क्यांनी उत्तीर्ण झाला आहे यात काहीच संशय नाही.

# आगामी उपक्रमः रेकि शिबिरे

| दिनांक | रेकि शिक्षक | केंद्र/स्थान | श्रेणी | नोंदणीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| ११ व १२ डिसेंबर २०२१ | अरूणा | हैद्राबाद | १ ली | रामलिंगम (९९११५५५९७४)<br>माधवी सप्तर्षी (९८२४५८०९१९) |
| १८ व १९ डिसेंबर २०२१ | कृपा चोक्सी | राजकोट | १ ली | ज्योति सरैय्या (९८२४२९९१५३) |
| २५ व २६ डिसेंबर २०२१ | अजित सर | मुंबई (उत्तर) | १ ली | अर्चना पाटील (९८२०३७०४६९) |
| २५ व २६ डिसेंबर २०२१ | राकेश कुमार | मुंबई (दक्षिण) | १ ली | शारदा गुरव (९८१९२१५६५०) |
| २५ व २६ डिसेंबर २०२१ | अरूणा | चैन्नई | १ ली | अरूणा (७२५९६२०८६८) |
| २५ व २६ डिसेंबर २०२१ | संगीता कुलकर्णी | वडोदरा | १ ली | चंद्रेशभाई (९९७४७०१२००) |
| १५ व १६ जानेवारी २०२१ | अजित सर | नाशिक | १ ली | मोनाली राक्षे (९४२०६९२१३६) |